# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
## (दुपार)

जा.क्र.४१७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांकः—१६/०७/२०१६.

**१) मोटार सायकलची जिप गाडीच्या धडकेत गंभिर जखमी . :—**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी १८.२० वा. दर. शंकर खुशाल हलमारे वय ५७ वर्ष, रा. कनेरी यातील फिर्यादीची शासकीय गाडी क्र. एमएच ३६/२०१७ ही लाखनी वरुन भंडारा कडे चालवित येत असता समोरुन विरुध्द येणा—या आरोपी चालकाने आपल्या ताब्यातील मोटार सायकलने डब्बल सिट चालवित आणुन फिर्यादीचे जिप गाडीला कोकणागड येथे धडक दिल्याने मो. सा. चालक व मागे बसलेला इसम हे दोघेही गंभिर जखमी झाल्याने व जिप मध्ये बसलेले बिडीओ बगडे यांचे डावे खांदयाला किरकोळ मार लागल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादंवि सहकलम ७(१)/१७७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गौर पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**२)कारची मोटार सायकलला धडक, एक जखमी. :—**

दिनांक ११/०७/२०१६ रोजी १४.०० वा. दर. यातील आरोपी कार चालकाने आपल्या ताब्यातील कार भरधाव वेगाने व निष्काळीपने चालवुन फिर्यादी यांचे पती अस्पाक आलमीया शेख वय ३० वर्ष, रा. नागभीड चे मोटार सायकल क्र. एमएच ३४ ए एफ ४०७१ ला ठोस मारुन जखमी केले व अपघाताची सुचना न देता पडुन गेल्याने फिर्यादीचे तोडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २२९,३३७,३३८ भादंवि सहकलम १३४/१७७,१८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. बावने पो.स्टे. अडयाळ हे करीत आहे.

**३) प्लॉटची जागेच्या कारणावरुन भांडण व मारहान केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १५/०७/०१६ चे १२.०० वा. दर. आरोपी हा फिर्यादी यांचे घरी जावुन ''तु मला का म्हणुन वापर करीत असलेल्या प्लॉटची जागा देत नाही'' व घराचे छपरीत येवुन भांडण करुन विटाने फिर्यादीच्या डोक्यावर मारुन जखमी केले असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४८,३२४ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. उईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :–**

दिनांक १५/०७/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा–यांवर ०४ केसस, तिन सिटर वाहनांवरती ०८ केसेस व इतर वाहनांवरती १०८ केसेस करण्यात आलेल्या आहेत

( श्री.बी.आर.गाडे)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.